९६३/५

असा. क्र. १ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी ५, २००७/पौष १५, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| | पृष्ठे |
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.**---महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | १-२ |

दिनांक ५ जानेवारी २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ. मा. शिंदेकर,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ५ जानेवारी २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

## महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९७७ चा महा. १. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६, यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



[किंमत : रुपये ९.००]

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) मधील, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :— १९७७ चा महा. १.

"परंतु असे की, ज्यावेळी एखाद्या व्यक्तीने पाच वर्षांपेक्षा जास्त मुदतीसाठी सदस्य म्हणून सेवा केली असेल, त्यास त्याच्या पाच वर्षांवरील प्रत्येक वर्षासाठी दरमहा पाचशे रुपये या प्रमाणात जादा निवृत्तिवेतन दिले जाईल : ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई